**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री. टी. आर. ऊर्फ रामकुमार सावंत,
रिंग रोड, गल्ली क्र.४, गांधीनगर,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
कोल्हापूर जिल्हा परिषद.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक-वर्ग-२,
मेन राजाराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, जुना राजवाडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८५/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १६.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), कोल्हापूर जिल्हा परिषद.कोल्हापूर श्री. आनंद लक्ष्मण जोशिलकर

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापक-वर्ग-२, मेन राजाराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, जुना राजवाडा, कोल्हापूर श्री. विलास धोंडीराम माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २९.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २६.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ४.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २७.११.२००८ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

(१) सन १९९१-९२ व सन १९९२-९३ साली मी शिकविलेल्या मराठी व इतिहास (५ वी ते १० वी) विषयाच्या निकालाची माहिती बिनचूक द्यावी, दि. २५.११.२००२ चे परिपत्रक

(२) सन १९९८ सालच्या प्रवास भत्याची वसुली करू नये अशी शिफारस करणेबाबत दि. ४.८.२००९ च्या मिटींगमध्ये शिक्षणाधिकारी (निरंतर) यांनी स्पष्ट सूचना दिली असता तसे न करता निर्णय घेणेचा प्रस्ताव सादर करून दिशाभूल केली जात आहे, याबाबतच्या चुकीचा दुरूस्ती तपशील सौ.दिक्षित मुख्याध्यापिका व श्री. पोवार लिपिक यांनी द्यावा.

(३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयात सुनावणी प्रसंगी श्री. पोवार यांनी माझे चारित्र्य हनन करणेकामी काय शब्द वापरले, त्यावर मी त्यांना प्रतिकार काय केला, त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी काय दिले, हे त्यांच्या शब्दातील उत्तर, जसेच्या तसे घेऊन मग पुढे अनवधानाने ... हा मजकूर येणे व त्यावर मुख्याध्यापकांची शिफारस अशी तपशीलवार माहिती द्यावी. दि. २२.४.२००८ च्या पत्रातील मुद्दा क्र.१ चा तपशील देताना श्री. पोवार यांनी जी चुकीची तारीख दिली आहे त्यातील हेतू काय? आपण त्याखाली समोर म्हणून सही शिक्का केला आहे याचा तपशील

## विवेचन

सन १९९१ ते १९९३ या काळात आपण शिकवत असलेल्या विषयांचा तपशील व अन्य दोन मुद्यांची माहिती अपीलकर्ता श्री. टी.आर. ऊर्फ रामकुमार सावंत यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक वर्ग २, मेन राजाराम हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही, अशा कारणावरुन श्री. सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स श्री. सावंत पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित नव्हते, म्हणून आज दि. १६.९.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. वैद्यकीय कारणास्तव आपण सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे श्री. सावंत यांनी वैद्यकीय प्रमाणपत्रासह आयोगास कळविले.

आपण आता सेवानिवृत्त असून श्री. सावंत यांनी मागितलेली माहिती आपण दिली होती. कार्यालयीन दप्तरानुसारच माहिती दिलेली आहे, असे लेखी निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. रेखा अनिल दीक्षित यांनी आयोगाला सादर केले.

आपण शिकवितो त्या विषयांची माहिती द्यावी, असा श्री. सावंत यांचा आग्रह आहे. असा स्वतंत्र तपशील ठेवला जात नसल्यामुळे मूळ अभिलेखानुसार सर्व विषयांची माहिती देण्यात आली. त्यांना देण्यात आलेल्या प्रवास भत्याची वसुली करण्याचा आदेश लेखा परीक्षकांनी दिला आहे. ती वसुली करु नये, असा प्रस्ताव सादर करुन दुरुस्ती करावी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयात श्री पोवार यांनी आपले चारित्र्य हनन करण्याकामी वापरलेले नेमके शब्द द्यावेत, अशा स्वरुपाच्या मागण्या श्री. सावंत यांनी केल्या आहेत. तत्कालीन अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयानुसार श्री. पोवार यांनी श्री. सावंत यांना दिलगिरीचे पत्रही

दिले आहे, परंतु नेमके शब्द द्यावेत, अशी त्यांची मागणी आहे. या बाबी माहितीच्या अधिकारात येत नाहीत, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. विलास धोंडीराम माने व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. आनंद लक्ष्मण जोशिलकर यांनी केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शांताराम भिकोबा बोधे
३०२, हरीपद सोसायटी, जयविजय सोसायटीजवळ,
पारसीवाडा, सहार रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-९९

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,
पाचगणी नगरपरिषद, पाचगणी, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८७/ सातारा २४९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त (समान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.एस.एस.गोसावी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,
पाचगणी नगरपरिषद, पाचगणी, जि.सातारा श्री.राजेंद्र चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.१०.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

अनधिकृत बांधकामाबाबत मुख्याधिकारी पाचगणी नगरपरिषद यांनी दिलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने कोणत्या नियमाच्या आधारे नगरपरिषदेमार्फत अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येणार आहे, त्या नियमाची छायांकित प्रत.

## विवेचन

अनधिकृत बांधकामाबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, पाचगणी नगरपरिषद, पाचगणी, जि.सातारा यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पुणे यांच्या आदेशानुसार माहितीबाबतची कार्यवाही केली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.शांताराम भिकोबा बोधे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आयोगाने उपायुक्त, सामान्य प्रशासन यांच्याकडून मागविला होता. अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी म्हणून उपायुक्त, पुणे यांच्याकडे केलेल्या एका अपिलात अपिलीय प्राधिकारी म्हणून मुख्याधिकारी यांची नेमणूक केली असल्याचे नमूद करुन उपायुक्त कार्यालयाने ती कागदपत्रे आपल्याकडे पाठविल्याचे नमूद केले होते, परंतु ती कागदपत्रे आपल्याला प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही. मात्र त्याच अर्जामधील सर्व माहिती अपीलकर्त्याने दि.३.१०.२००८ च्या अर्जान्वये पुन्हा मागितली होती व आपण सुनावणीस येणार नाही, असे स्पष्ट केले होते. ती सर्व कागदपत्रे त्यांना दि.२०.१०.२००८ रोजी पाठविण्यात आली, असे मुख्याधिकारी, पाचगणी गिरीस्थान, नगरपरिषद पाचगणी यांनी लेखी व तोंडी नमूद केले. अन्य अपिलातील कागदपत्रे मुख्याधिकाऱ्यांकडे पाठविली

गेली नव्हती, परंतु त्याच विषयावरील तीच माहिती देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस. गोसावी यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शांताराम भिकोबा बोधे
३०२, हरीपद सोसायटी, जयविजय सोसायटीजवळ,
पारसीवाडा, सहार रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-९९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,
पाचगणी नगरपरिषद, पाचगणी, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८७/ सातारा २४९४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त (समान्य प्रशासन),
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.एस.एस.गोसावी

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याधिकारी,
पाचगणी नगरपरिषद, पाचगणी, जि.सातारा श्री.राजेंद्र चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.१०.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

अनधिकृत बांधकामाबाबत मुख्याधिकारी पाचगणी नगरपरिषद यांनी दिलेल्या नोटिशीच्या अनुषंगाने कोणत्या नियमाच्या आधारे नगरपरिषदेमार्फत अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येणार आहे, त्या नियमाची छायांकित प्रत.

## विवेचन

अनधिकृत बांधकामाबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, पाचगणी नगरपरिषद, पाचगणी, जि.सातारा यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पुणे यांच्या आदेशानुसार माहितीबाबतची कार्यवाही केली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.शांताराम भिकोबा बोधे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आयोगाने उपायुक्त, सामान्य प्रशासन यांच्याकडून मागविला होता. अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी म्हणून उपायुक्त, पुणे यांच्याकडे केलेल्या एका अपिलात अपिलीय प्राधिकारी म्हणून मुख्याधिकारी यांची नेमणूक केली असल्याचे नमूद करुन उपायुक्त कार्यालयाने ती कागदपत्रे आपल्याकडे पाठविल्याचे नमूद केले होते, परंतु ती कागदपत्रे आपल्याला प्राप्त झालेली नाहीत. त्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही. मात्र त्याच अर्जामधील सर्व माहिती अपीलकर्त्याने दि.३.१०.२००८ च्या अर्जान्वये पुन्हा मागितली होती व आपण सुनावणीस येणार नाही, असे स्पष्ट केले होते. ती सर्व कागदपत्रे त्यांना दि.२०.१०.२००८ रोजी पाठविण्यात आली, असे मुख्याधिकारी, पाचगणी गिरीस्थान, नगरपरिषद पांचगणी यांनी लेखी व तोंडी नमूद केले. अन्य अपिलातील कागदपत्रे मुख्याधिकाऱ्यांकडे पाठविली

गेली नव्हती, परंतु त्याच विषयावरील, तीच माहिती देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एस.एस. गोसावी यांनी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे १

श्री.रामचंद्र आण्णा शेलार,
रा. म्हसवे, पो. वर्ये, ता.व जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रादेशिक सहसंचालक (साखर),
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक, — उत्तरवादी
किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना लि. भुईज, ता.वाई, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.९.०९ (वि.अ.नि.का.) |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी संचालक,<br>किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना लि. भुईज, ता.वाई, जि.सातारा श्री.एल.बी.शेळके | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २८.४.०८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ८.१०.०८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १५.११.०८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २६.१२.०८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

श्री. सोनवणे यांनी अर्जदाराचे रु.२५,०००/- नुकसान केले प्रकरणी अर्जदाराने सदर नुकसान भरपाई मिळावी व श्री. सोनवणे यांना निलंबित करावे या मागणीसाठी दि. ३१.१.२००८ रोजी दिलेल्या नोटीशीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामचंद्र अण्णा शेलार (वय ८७ वर्षे) यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना मर्यादित, भुईंज यांच्याकडे मागितलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.५.५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर होते. अपीलकर्त्यांचे बंधू श्री.लक्ष्मण अण्णा शेलार यांचा नोंद न केलला ऊस कारखाना नेत नसल्यामुळे रुपये २.४० लाख नुकसानभरपाईची मागणी त्यांनी केली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर), पुणे विभाग, पुणे श्री.डी.आर.घोडे यांनी प्रपत्रात नमूद केले.

श्री.शेलार सातत्याने विविध स्वरुपाचे माहितीच्या अधिकारातील व अन्य अर्ज कारखान्याकडे करीत असतात. वेळोवेळी त्यांना सर्व माहिती व अर्जांची उत्तरे दिली जातात. आपले समाधान झाल्याचे व कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे त्यांनी दि.२४.१०.२००८, दि.५.७.२००९ अशा विविध तारखांना लिहून दिले आहे. पोलिसांच्याकडे तक्रार, आत्मदहनाच्या नोटिसा आदी स्वरुपाचा पत्रव्यवहार त्यानंतरही ते करीत असतात, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक श्री.एल.बी.शेळके यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी विस्ताराने नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.शेलार माहितीबाबत सातत्याने उलटसुलट निवेदने करीत असल्याचे दिसते. कारखान्याने वेळोवेळी त्यांना माहिती दिली असून आणखी कोणतीही माहिती हवी

असल्यास देण्याची तयारी असल्याचे प्रतिपादन कार्यकारी संचालकांनी केले आहे. या बाबी लक्षात घेता, अपील दखलपात्र ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आयोग**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१६.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - १

श्री. विजय दिनकर निपाणे
६८५अ, मंगळवार पेठ, सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता, **उत्तरवादी**
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, संगमनगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| **३** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,<br>सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा<br>श्री. कि. बा. कुलकर्णी<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग, संगमनगर, सातारा<br>श्री. दि. रा. मोरे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाही बाबत खुलासा मिळावा सन १९९७ पासून २००६ पर्यंतच्या अनुकंपा प्रतीक्षा यादीतील मयत शासकीय कर्मचाऱ्यांच्या वारसदारांची यादी. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने सदर अपील प्रकरणी दि. २१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

मूळ अर्जानुसार अपीलकर्त्यास माहिती दिलेली आहे. अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी, ही श्री. निपाणे यांची मूळ मागणी असल्याचे जनमहिती अधिकारी, श्री. दि. रा. मोरे यांनी सांगितले. नियमानुसार पाच वर्षांत अनुकंपा तत्त्वाखालील नोकरी मिळण्याबाबत अर्ज न दिल्याने अर्जाचा विचार केला नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

नोकरीची मागणी ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२४-९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर
रा. जांभूळवाडी रोड, दत्तनगर, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहआयुक्त (जि.घ.) — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९०/५९१/५२४/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.८.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर
रा. जांभूळवाडी रोड, दत्तनगर, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
तर्फे मुख्य उद्यान अधीक्षक, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. यशवंत शि. खैरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.११.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.१९.१.१९८७ रोजी सारसबाग उद्यानातील कर्मचाऱ्यांचे सारसबागेतील वालचंद इंडस्ट्रीजचे कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी केलेला अर्ज व भारती मजदुर संघ, पुणे यांनी दिलेल्या पत्रात महानगरपालिकेच्या सारसबागेत माळी काम करणाऱ्या अकरा महिला व आठ पुरुष कामगारांना सेवेत सामावून घेण्याबाबत महापालिकेने केलेल्या कारवाईची माहिती |

## विवेचन

सारसबाग उद्यानातील कर्मचा-यांना कत्रांट संपल्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबतच्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती व महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाची प्रत, याबरोबरच तत्कालीन उद्यान अधीक्षक श्री. यशवंत खैरे यांच्या सेवेसंबंधातील कागदपत्रांची मागणी अपीलकर्ता श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर यांनी केली होती. वारंवार मागणी करुनही आपल्याला ही माहिती दिली जात नसल्याच्या कारणावरुन श्री. कोळेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

महानगरपालिकेच्या सेवेत घेण्याबाबतचा मूळ अर्ज आपण उद्यान अधीक्षकांकडे केला होता. त्यानंतर तो आयुक्तांकडे पाठविण्यात आला व सन १९८५ ते १९८७ या कालावधीमध्ये सारसबाग येथे ठेकेदारामार्फत काम केलेल्या मजुरांना महानगरपालिका सेवेत घेण्याचा आदेश तत्कालीन महानगरपालिका आयुक्त श्री. देवव्रत मेहता यांनी दिला होता. त्याची प्रत आपल्याला दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री.कोळेकर यांनी केले. श्री. कोळेकर यांना वेळोवेळी याबाबतची माहिती देण्यात आली आहे. ते म्हणतात तशा प्रकारचा अर्ज अभिलेखात आढळत नाही. तसेच श्री. देवव्रत मेहता यांनी संबंधित मजुरांना महानगरपालिकेच्या सेवेत घेण्याबाबत कोणताही आदेश दिल्याची नोंद नाही, हेही त्यांना कळविण्यात आले आहे. या संदर्भात, तसेच उद्यान विभागाचे अधिकारी/सेवक यांच्याविषयीची वैयक्तिक मागविणारे ८२ अर्ज श्री. कोळेकर यांनी आतापर्यंत केले असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. संबंधित संचिकेची फेरतपासणी करुन श्री. कोळेकर यांना कळवावे, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

श्री. खैरे यांच्या संदर्भातील माहिती सेवक विभागाकडे उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. सेवकविभागाकडे शोध घेऊनही ही माहिती मिळत नसल्यामुळे आपल्या व्यक्तीगत संग्रहातून संबंधित कागदपत्रांच्या प्रती आपण देऊ, असे निवेदन श्री. यशवंत खैरे यांनी केले.

तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाची नोंद आढळत नाही, असा अहवाल श्री. खैरे यांनी दि. १२.९.२००८ रोजी व आपल्या व्यक्तीगत संग्रहातून आपल्या विषयीच्या वैयक्तीक माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती व कोळेकर यांना देण्यात आल्याचा अहवाल श्री. खैरे यांनी दि. ११.११.२००८ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर
जांभुळवाडी रोड, दत्तनगर, ता.हवेली,
जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सल्लागार (कामगार) व
सेवकवर्ग विभाग अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (सेवकवर्ग),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.०८.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. लक्ष्मण ज्ञानू कोळेकर<br>जांभुळवाडी रोड, दत्तनगर, ता.हवेली, जि.पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** सल्लागार (कामगार) व<br>सेवकवर्ग विभाग अधिकारी, पुणे महानरगपालिका, पुणे श्री. के. सी. कारकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (सेवकवर्ग),<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.शिवाजी दौंडकर | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.०९.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०३.१०.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.११.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.अरुण पाटील, उपायुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या नियुक्तीबाबत | |

## विवेचन

श्री. अरुण पाटील यांची नेमणूक लोकल व्हेईकल डेपोला कधी झाली, त्या आदेशाची प्रत, तसेच त्यांची कामगार अधिकारी पदी कोणत्या साली नेमणूक झाली व त्यांच्या पगार स्लीपची छायांकित प्रत इ. माहिती अपीलकर्ता श्री.लक्ष्मण ज्ञानू कोळेकर यांनी मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्याकडून प्राप्त माहितीने व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्याने श्री.कोळेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले. या अपिलाची सुनावणी दि.१२.०८.२००९ रोजी घेण्यात आली.

आपणास पूर्ण माहिती मिळाली नाही, परंतु संबंधित अधिकारी आता मनपाच्या सेवेत नसल्याने हे अपील आपण चालवू इच्छित नाही. अपील निकाली काढावे, असे निवेदन श्री.कोळेकर यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : १८ / ०९/२००९**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र.पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. बाळकृष्ण लक्ष्मण कोलते
रा.सोरटेवाडी, पो.करंजे, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत सायबाची वाडी, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाळकृष्ण लक्ष्मण कोलते
रा.सोरटेवाडी, पो.करंजे, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,
पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे विद्यमान श्री.के.एन.मोरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.०८.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१०.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.१२.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती - <br><br> मिळकत नं.२ (५०/५१) चे उतारे, बक्षिसपत्राची नोंद दप्तरी न करणेबाबतचा खुलासा, मिळकत नं.७१२ च्या बक्षीसपत्राच्या अनुषंगिक माहिती. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, सायबाची वाडी, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.डी.चौधर यांनी ६८ दिवस विलंबाने दिल्याबद्दल त्यांना रु.१७००० शास्ती लावण्याची शिफारस तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाच्या निर्णयात केली होती. त्यानुसार शास्ती व्हावी, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण लक्ष्मण कोलते, सोरटेवाडी, पोस्ट करंजे, ता.बारामती, जि.पुणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. ''

आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता मिळकतीचे तेच तेच उतारे पुनः पुन्हा मागत असून यापूर्वीही त्यांना वेळोवेळी उतारे देण्यात आले आहेत, असे श्री.चौधर यांनी प्रपत्रात नमूद केले. अपीलकर्ता गैरहजर होते, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

आपण जुलै २००६ ते नोव्हेंबर २००६ अखेर सायबाची वाडी येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होतो. या काळात श्री.कोलते यांना हीच माहिती दि.१८.८.२००६, दि.२३.८.२००६, दि.११.९.२००६, दि.१०.१०.२००६ अशी चार वेळा देण्यात आली. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,पंचायत समिती, बारामती श्री.व्ही.जे.गुळवे यांनी दि.६.१२.२००६ रोजी अपिलाचा निर्णय दिला. त्या दिवशीच आपण पुन्हा श्री. कोलते यांना उतारे दिले, असे श्री.चौधर यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. वेळोवेळी त्यांनी ही माहिती श्री.कोलते यांना दिलेली असल्यामुळे व तशी श्री.कोलते यांची पोहोच असल्यामुळे सर्व अर्जांचा विचार करता त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येऊ नये, अशी शिफारस अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत) श्री.गुळवे यांनी दि.२०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या अहवालात केली आहे.

सायबाची वाडी या गावचे सरपंच व ग्रामसेवक यांनी इतर सात जणांच्या संगनमताने मिळकतीचा खोटा उतारा तयार करुन त्या उताऱ्याचा वापर करुन दोन खोटी बक्षिसपत्रे केलेली आहेत व त्या बक्षिसपत्रांच्या आधारे दस्तनोंदणी केलेली आहे. हे बक्षिसपत्र रद्द व्हावे व खोटी कागदपत्रे करणाऱ्यांवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी आपण गेल्या काही वर्षांपासून झगडत आहोत. त्यामुळे आपल्याला खोटी माहिती दिली जात आहे, असे प्रतिपादन श्री.कोलते यांनी केले.

अद्यापही श्री.कोलते यांचे किमान पाच अर्ज त्याच माहितीच्या मागणीसाठी आपल्याकडे आहेत. सर्व अभिलेख दाखवून आवश्यक त्या प्रती त्यांना देऊ केल्या व वेळोवेळी दिल्या. तरीही पुनः पुन्हा तीच मागणी ते

करीत असून मुख्यत: प्रशासकीय कार्यवाहीची मागणी आहे. या प्रकरणी न्यायालयात त्यांनी दावा दाखल केला आहे, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.के.एन.मोरे यांनी सांगितले. सोबत पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली.

वरील बाबी लक्षात घेता श्री.कोलते यांना माहिती देण्यात आली आहे. पुन: पुन्हा तीच माहिती दिली असल्यामुळे माहिती नाकारण्याचा अगर दडविण्याचा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.डी.चौधर यांचा उद्देश असल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे दंडात्मक कारवाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे. तसेच कागदपत्र बनावट आहेत की नाही, व असल्यास संबंधितांवर करावयाची कारवाई या विषयाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र बक्षिसपत्राच्या अनुषंगाने तत्कालीन व आजचे उतारे देऊन त्याबाबतच्या नोंदीविषयीची वस्तुस्थिती नि:संदिग्ध शब्दात श्री.कोलते यांना लेखी कळविली जाणे आवश्यक आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) बक्षिसपत्राच्या अनुषंगाने तत्कालीन व आजचे उतारे देऊन त्याबाबतच्या नोंदीविषयीची वस्तुस्थितीची माहिती अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण लक्ष्मण कोलते यांना आठ दिवसात लेखी देऊन अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बारामती, ता. बारामती यांनी अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. १५.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खलीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६०७ / कोल्हापूर | श्री. उमेश जर्नादन पवार रा. १८८८, डी वॉर्ड, ओमेगा टॉवर्स, ऑफीस नं. २०४, राजारामपूरी, ९ वी गल्ली, कोल्हापूर | उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | सहनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | दि.२९ मे २००८ रोजी दैनिक तरुण भारत मध्ये आलेल्या लेखा परीक्षकांच्या काळ्या यादीबाबतची माहिती व ऑफीस फाईल मधील संबंधित पत्र व्यवहार पाहणे करिता मिळणेबाबत | अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी या तिघांमध्ये दिनांक ४/४/२००९ रोजीच्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमात एकत्रित झालेल्या चर्चेनुसार कार्यालयातील संबंधित व्यवहाराची धारिका दाखवून माहिती तोंडी देण्याचे ठरलेले आहे. अपील निकाली काढण्याबाबत उभय बाजूंनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ५९१ / कोल्हापूर | श्री. दत्ताजीराव शंकरराव भोसले रा. घर नं. ७२, डी वॉर्ड, महाद्वार रोड, कोल्हापूर | नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर जि.कोल्हापूर | अधिक्षक, भूमी अभिलेख कोल्हापूर, जि.कोल्हापूर | सि. स. नं. ७२, ७३ चे दरम्यानचे भिंतीबाबत दिनांक ३० एप्रिल १८९० च्या कराराची नक्कल / प्रत मिळणेबाबत | अपीलकर्त्याने मागणी केलेल्या कराराची प्रत ही सन १८९० या वर्षातील आहे. सदरची प्रत अभिलेखात समावेश केलेली नसल्याने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येत नाही. हे कागदपत्र ११८ वर्षापूर्वीचे असल्याने ते उपलब्ध करुन देणे शक्य नाही, ही दिनांक ४/४/२००९ रोजीच्या विशेष अपील निर्गत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कार्यक्रमातील प्रपत्रात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेली वस्तुस्थिती मान्य करण्यात आली आहे. |
| ३ | ५८९/ कोल्हापूर | श्री. किसन धोंडी गिरीगोसावी रा. आपटी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत आपटी, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | विस्तार अधिकारी पंचायत समिती पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | मु. आपटी ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील जलस्वराज्य प्रकल्पा-बाबतची एकूण १२ मुद्यांची माहिती | अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीसाठी अंदाजे रुपये ७०००/- खर्च येत आहे व अपीलकर्ता हा दारिद्रय रेषेखालील असल्याने सदरची सर्व माहिती त्यास विनामुल्य देणे आवश्यक आहे. तथापी जलस्वराज्य प्रकल्पाकडे निधी उपलब्ध नसल्याने, निधी उपलब्ध झालेस माहिती मोफत देणेत येईल, तसेच आवश्यक ती माहिती व कागदपत्रे निरिक्षणासाठी केव्हाही उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याचे अध्यक्ष व सचिव जलस्वराज्य प्रकल्प, आपटी यांनी दिनांक ४/४/२००९ रोजीच्या विशेष अपील निर्गत कार्यक्रमातील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ३६०/ २००९/ कोल्हापूर | श्री. दिलीप आदाप्पा कामत प्लॉट नं. ४५, नगरपालिका नोकर हौसिंग सोसायटी, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | माहिती अधिकारी, जयसिंगपूर नगरपालिका, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | मुख्याधिकारी, जयसिंगपूर नगरपालिका, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | नगरपालिका नोकर हौसिंग सोसायटी, जयसिंगपूर मधील सांडपाण्याच्या निच-याबाबत | १) अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.<br>२) जुनी तुंबवून ठेवलेली गटारे चालू करण्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीबाबतची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि, यासंदर्भातील मूळ अर्जावर केलेल्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास देऊन आयोगास अहवाल सादर करावा. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनुक्रमांक १ ते ४ वरील एकूण ४ अपिले (क्र. ६०७/कोल्हापूर, ५९१/कोल्हापूर, ५८९/कोल्हापूर, व ३६०/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र.३६०/२००९/कोल्हापूर प्रकरणी निष्कर्षात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करुन जन माहिती अधिकारी यांनी मुदत पुर्तीनंतर आठ दिवसात अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०१-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
रा. टेक्निकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं. १४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०८/कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, जि.सांगली प्रतिनिधी श्री.रा.पां.पाटील

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर जि.कोल्हापूर श्री.जे.जु.बारदेसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

वर्ग ०३ व वर्ग ०४ मधील कर्मचा-यांना देण्यात आलेल्या दि. ०१.०४.२००८ ते दि. ३१.०७.२००८ मधील भविष्य निर्वाह निधी अग्रीम धनादेश वाटप व्यवस्थेसह एकूण चार मुद्दयांची माहिती.

## विवेचन

भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या संदर्भात आपण मागितलेल्या नमुन्यानुसार माहिती दिली नाही. तसेच दिलेली माहिती अपुरी आहे, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लावावी, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि.४.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स श्री.निकम उपस्थित नव्हते, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

आपण दि.७.८.२००८ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती तीस दिवसांच्या मुदतीत-म्हणजे दि.५.९.२००८ पर्यंत आपल्याला मिळावयास हवी होती. परंतु शुल्क भरण्याचे पत्र आपल्याला दि.१०.९.२००८ रोजी प्राप्त झाले. म्हणून अतिरिक्त शुल्काचा बोजा आपल्यावर टाकण्याचे कारण नाही, माहिती नि:शुल्क मिळाली पाहिजे, म्हणून आपण अर्ज व अपील केल्यानंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार माहिती नि:शुल्क दिली. परंतु तीन मुद्दयांची माहिती दिली नाही. काही माहिती राहिलेली असल्यास अभिलेख पाहण्यास देऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिला. परंतु जाणीवपूर्वक माहिती दिली गेली नाही. प्रत्यक्ष संस्थेत जाऊन अभिलेखावरुन अल्पावधीत आपण माहिती घेतली. आपण दिलेल्या तक्त्यानुसार न देता सर्व

सहपत्रांसह अवाढव्य फाईलींचा झेरॉक्स प्रतींचा खर्च आपल्यावर लादण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकाऱ्यांनी केला, असे लेखी व तोंडी निवेदन श्री.निकम यांनी केले.

श्री.निकम यांनी दि.७.८.२००८ रोजी केलेला अर्ज दि.८.८.२००८ रोजी कार्यालयास प्राप्त झाला. दि.१.९.२००८ रोजी त्यांना शुल्क कळविण्यात आले. परंतु दि.१०.९.२००८ रोजी हे पत्र आपल्याला मिळाल्याचे त्यांनी कळविल्यानंतर प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार दि.३.१०.२००८ रोजी त्यांना माहिती नि:शुल्क देण्यात आली. तसेच सर्व अभिलेखांचे निरीक्षणही त्यांनी केले. कार्यालयात १२०० कर्मचारी असून रोज साधारणत: १०० धनादेश येतात व दिले जातात. त्याच्या स्वतंत्र नोंदी नसतात. त्यामुळे नोंदवहीच्या छायांकित प्रती दिल्या आहेत. विशिष्ट तक्त्यातच अशा प्रकारची माहिती तयार करुन देणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.जे.जु.बारदेसकर व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचे प्रतिनिधी श्री.रा.पां.पाटील यांनी नमूद केले. ज्या मुद्दयांची माहिती दिली नाही, असे श्री.निकम म्हणतात त्याचे स्पष्टीकरण प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी करण्यात आले होते. धनादेश वर्ग करण्याच्या विलंबास कारणीभूत असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे त्यांनी मागितली होती. परंतु अशा प्रकारचा विलंब झालेला नाही, असेही त्यांनी नमूद केले. धनादेश विलंबाने जातात याची सत्यता न आजमावता जन माहिती अधिकाऱ्यांनी हे विधान केल्याचे प्रतिपादन श्री.निकम यांनी केले. मात्र ही वस्तुस्थिती नसल्याचे श्री.बारदेसकर यांनी स्पष्ट केले. भविष्य निर्वाह निधी अग्रिम वेळेत मिळत नसलेल्या तक्रारींबाबतची माहिती त्यांनी मागितली होती. अशा प्रकारची तक्रार आलेली नाही. त्यामुळे या दोन मुद्दयांची माहिती देण्याचा प्रश्न येत नाही. आरटीआय २००५ कलम ४ नुसार स्वत:हून जाहीर करावयाची माहिती संस्था फलकावर लावलेली नाही, हे आक्षेपार्ह आहे, कायद्याचा भंग करणारे आहे, असा त्यांचा तिसरा मुद्दा आहे, यात कोणतीही माहिती मागितलेली नाही. मात्र त्यांचे हे म्हणणे योग्य नसून कलम ४ नुसार माहिती प्रसिध्द करण्यात आली आहे, असे प्रतिपादन श्री.बारदेसकर व श्री.पाटील यांनी केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अशी चर्चा झाल्याचे श्री.निकम यांनी मान्य केले. परंतु लेखी माहिती दिलेली नाही, असा आक्षेप नोंदविला. वस्तुत: पूर्ण स्पष्टीकरण केलेले असताना तांत्रिक मुद्दे उपस्थित करण्याचा अपीलकर्त्याचा प्रयत्न

दिसतो. विहित मुदतीत-म्हणजे दि.१.९.२००८ रोजी जन माहिती अधिकाऱ्यांनी पाठविलेले पत्र आपल्याला मिळाल्याचा पुरावा म्हणून दि.१०.९.२००८ अशी श्री.निकम यांनी नोंद केलेल्या लखोट्याची छायांकित प्रत श्री.निकम यांनी सादर केली. त्यावर टपाल खात्याचा शिक्का दि.८.९.२००८ चा आहे. अन्य अपिलांमध्येही श्री.निकम टपालखात्याचे शिक्के असलेल्या लखोट्याच्या छायांकित प्रती सादर करीत असतात. अशा काही प्रती त्यांनी सुनावणीच्या वेळी दाखविल्या. परंतु अनेक अर्ज व अपिले असतील, तर केवळ लखोट्यावरील शिक्क्याच्या तारखेवरुन आतील पत्राबाबतची निश्चिती करता येणार नाही, याची जाणीव अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

माहिती संकलित करुन देता येणार नाही, ही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची भूमिका योग्य नाही. परंतु विस्तृत स्वरुपातील माहितीची मागणी असताना प्रत्येक धनादेशाच्या स्वतंत्र नोंदी एकत्र करुन विशिष्ट तक्त्यातच त्या दिल्या पाहिजेत, अशासारखी मागणीही करता येणार नाही. त्या त्या माहितीच्या मागणीनुसार माहितीच्या संकलनाबाबतची कार्यवाही करावी लागेल. अशा स्थितीत अभिलेख अवलोकनाचा पर्याय रास्त असून तो अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
रा. टेक्नीकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं. १४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६११ / कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
रा. टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, जि.सांगली प्रतिनिधी श्री.आर.पी.पाटील

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कोल्हापूर जि.कोल्हापूर श्री.जे.जु.बारदेसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.११.२००८ |

**८.मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटंबधारे विभाग, कोल्हापूर कार्यालयाने सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजूर संस्था व कंत्राटदार यांना केलेल्या कामाचे वाटप. कोणाला कसे, किती व त्याची वर्गनिहाय टक्केवारी, वाटप करताना नियमानुसार अवलंबण्यात आलेली कार्यपध्दती, मजूर सहकारी संस्थंच्या शिफारस पत्रांच्या प्रमाणित प्रती, काम वाटप समिती सभेच्या प्रोसिडिंगची प्रमाणित प्रत, सभेसाठी हजर असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हजेरीपत्रकाची प्रत, निश्चित केलेल्या मजूर सहकारी संस्थांच्या टेंडर कामाचा कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या भेटींचा, मजूरांची हजेरी वगैरे अहवालाची प्रमाणित प्रत.

## विवेचन

दि.४.४.२००९ च्या आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर होते, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता व कंत्राटदार यांना दिलेल्या कामाबाबतच्या माहितीसाठी जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क रु.४०० भरुनही आपल्याला अद्याप पूर्ण माहिती मिळालेली नाही. मूळ अर्ज, प्रथम अपील, आयोगाकडील अपील यांच्या प्रती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना दिल्या, स्मरणपत्रे पाठविली तरीही माहिती देण्याची जबाबदारी जन माहिती अधिकाऱ्यांनी पार पाडलेली नाही. मुद्दा क्र.१ मधील कोणाला कामाचे वाटप केले, ही माहिती दिली नाही. मुद्दा क्र.२,४,५,६ बद्दल काहीही कळविले नाही. मुद्दा क्र.३ ची माहिती अपूर्ण व चुकीची दिली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री.निकम यांनी दि.९.९.२००८ रोजी शुल्क भरले व दि.१८.९.२००८ रोजी त्यांना माहिती देण्यात आली. याच पध्दतीची माहिती त्यांना पूर्वीही देण्यात आली आहे. जी माहिती आमच्या

कार्यालयाच्या अखत्यारीत येत नाही, त्याबाबत त्यांना तसे कळविण्यात आले आहे. आपल्या कक्षेतील सर्व अभिलेख अवलोकनासाठी श्री.निकम यांना उपलब्ध करुन देण्यात आले व अजूनही कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती त्यांना हव्या असल्यास त्यांना देण्याची तयारी आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.जे.जु.बारदेसकर व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.आर.पी.पाटील, सहाय्यक अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ यांनी नमूद केले.

समान काम वाटप धोरणास फाटा, बेरोजगारांना (घटनेच्या कलम ११ अन्वये) समान हक्क डावलून त्यांना आर्थिक नुकसान पोहोचविले, काम वाटप करण्यापूर्वी अवलंबावयाच्या कार्यपध्दतीनुसार घ्यावयाच्या सभेपूर्वी सात दिवस कामाची यादी वेबसाईटवर ठेवली नाही, मजूर संस्थांच्या शिफारसपत्रावर जिल्हा उपनिबंधक; सहकारी संस्था यांच्या मंजुरीविना कामाचे वाटप केल्याचे दाखवले, असे आक्षेप श्री.निकम यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहेत. हे आक्षेप प्रशासकीय कार्यवाहीविषयक असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील व्याख्येनुसार 'माहिती' ठरत नाही. मागितलेली काही माहिती अन्य प्राधिकारणाशी संबंधित आहे. अशा बाबतीत अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये आहे, मात्र एकापेक्षा अधिक प्राधिकरणांकडील माहिती असल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याबाबत अपीलकर्त्यास कळविणे व आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने त्या त्या प्राधिकरणाकडून ती माहिती प्राप्त करुन घेणे ही योग्य कार्यपध्दती आहे. त्यामुळे अन्य प्राधिकरणांकडील माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना जबाबदार धरता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

सौ. सुनिता शिरीष देशमुख
२७०, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
मरगाई गल्ली, कोल्हापूर-१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** उप शहर अभियंता,
वि.का.क्र.१, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१२+ ६१३+७११+७१२ /कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.०९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.संतोष जिरगे

**जन माहिती अधिकारी तथा** उप शहर अभियंता,
वि.का.क्र.१, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर विद्यमान श्री.महादेव मारुती निर्मळे
तत्कालीन श्री.नेत्रदीप शंकरराव सरनोबत

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ६१२ | दि.२४.१०.२००८ | दि.१०.११.२००८ | दि.२५.११.२००८ | दि.१०.१२.२००८ |
| ६१३ | दि.७.११.२००८ | दि.२७.११.२००८ | दि.९.१.२००९ | दि.३.२.२००९ |
| ७११ | दि.६.२.२००९ | दि.२७.२.२००९ | दि.२६.३.२००९ | दि.१७.४.२००९ |
| ७१२ | दि.२९.१.२००८ | दि.२६.२.२००९ | दि.२५.३.२००९ | दि.१७.४.२००९ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

**अपील क्र.६१२**-अर्जदाराच्या वापरातील संडासचे बांधकाम बेकायदेशीरपणे पाडून टाकलेबाबत अर्जदाराने दिनांक २७.१२.०७ ते २०.१०.०८ या कालावधीत कोल्हापूर महानगरपालिकेकडे केलेल्या एकूण ४ तक्रार अर्जांवरील कार्यवाहीबाबतची माहिती, तसेच सदर तक्रारींवर कोणत्या नियमानुसार, कोणती कार्यवाही व किती दिवसात कार्यवाही करणे आवश्यक आहे याबाबतचा खुलासा व आता पर्यंत खरेदीदारावर कोणती कार्यवाही केली आहे याची माहिती.

**अपील क्र.६१३**-सौ. साधना सुरेश पाटील यांनी संडास शिफ्ट करणेसाठी दिनांक ६.६.०८ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने श्री.अशोक बोळके, आरोग्य निरीक्षक, कोल्हापूर महानगरपालिका यांनी जागेची पाहणी करुन दिलेल्या पाहणी अहवालाचा तपशील, तसेच सदर इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे केले आहे काय व मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करताना खरेदीदार यांच्या वरील दिनांक ६.६.०८ च्या अर्जानुसार वापरातील संडासचे बांधकाम पाडण्याची अथवा संडास शिफ्ट करणेची आवश्यकता होती काय, याबाबतचा खुलासा

**अपील क्र.७११-** दि.२७.११.२००८ च्या आपल्या पत्रानुसार मागितलेल्या लेखी मागणीचा अंतर्भाव कोणत्या शासन निर्णयाचे अंतर्गत येत नाही त्याची शासन निर्णयाची प्रत. तसेच अभिलेख स्वरुपातीलच माहिती अर्जदारांनी घेणे बंधनकारक असल्याबाबतचे शासन निर्णयाची प्रत.

**अपील क्र.७१२**-संडास जोडणीचे परवानगीचे आदेशाची प्रत. ड्रेनेज जोडणी करण्याकरिता रस्ता खुदाईची रक्कम भरलेल्या पावतीची छायांकित प्रत व रस्ता पूर्ववत केल्याबाबत मुकादम अगर संबंधित अधिकारी यांचे रिपोर्टची प्रत. ड्रेनेज विभागाकडे पाठविलेल्या पत्राची व लेखी आदेशाची प्रत. डिमोलिशन / पुनर्बांधकामास परवानगीचे अर्जावर झालेल्या आदेशाची नक्कल

## विवेचन

सौ.साधना सुरेश पाटील यांनी संडासाची पुनर्बांधणी करण्यासाठी केलेल्या अर्जानुसारच्या पाहणीचा तपशील, आपल्या वापरातील संडासाचे बांधकाम बेकायदेशीपणे काढून टाकल्याच्या आपल्या चार तक्रार अर्जांवर केलेली कार्यवाही आदी अनुषंगाने अपीलकर्त्या सौ.सुनिता सुरेश देशमुख यांनी चार अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत. सातारा येथे दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या (अपील क्र.६१२ व ६१३) 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स सौ.देशमुख उपस्थित नव्हत्या. कोल्हापूर येथे आपल्या सर्व अपिलांची सुनावणी घ्यावी, असे त्यांनी तेव्हाही व आजच्या सुनावणीच्या वेळीही लेखी निवेदनाद्वारे कळविले.

अपील क्र.६१२ व ६१३ यांची सुनावणी निश्चित करण्यात आली होती. अपील क्र.७११ व ७१२ याच विषयाबाबतची व त्याच स्वरुपाची असल्यामुळे कागदपत्रांच्या आधारे त्यांचाही विचार याच वेळी एकत्रितरीत्या करण्यात आला.

सौ.देशमुख या सौ.साधना सुरेश पाटील यांच्या मालकीच्या घरात कूळ आहेत. आपल्याला संडासाची स्वतंत्रपणे परवानगी द्यावी, अशी त्यांची मागणी आहे व या अनुषंगाने कार्यवाहीबाबत महानगरपालिकेकडे त्या सातत्याने विविध स्वरुपाचे अर्ज करीत आल्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांनी केलेले अर्ज हा त्याचाच एक भाग आहे. मुळात कूळ-मालक असा वाद असून मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्यांनी मागितलेली सर्व माहिती त्या त्या वेळी देण्यात आली आहे. तसेच संबंधित विषयातील सर्व नस्ती त्यांना दाखविण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.नेत्रदीप शंकरराव सरनोबत व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.महादेव मारुती निर्मळे यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह केले. आपण स्वत: सौ.देशमुख यांच्याकडे जाऊन त्यांच्या मागणीनुसार कार्यवाही करणे महापालिका नियमानुसार कसे शक्य नाही हे त्यांना संबंधित नस्तीसह स्पष्ट केले. महापालिकेच्या नियमानुसार बांधकामाबाबतची परवानगी मालकालाच दिली जाते, हेही त्यांना सांगितले. परंतु तरीही त्यांचे समाधान झालेले नाही, असे निवेदन श्री.निर्मळे यांनी केले. जोपर्यंत आपल्याला संडास बांधण्याकरिता परवानगी मिळत नाही तोपर्यंत वारंवार अर्ज करीत राहणार, असे सौ.देशमुख यांनी आपल्याला समक्ष सांगितल्याचे श्री.निर्मळे यांनी लेखी निवेदनात नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री.गणेश एन.देशमुख यांनी माहितीच्या पलीकडे जाऊन प्रशासकीय बाबींची तपासणी करण्याचा आदेशही अपील निर्णयात दिला होता. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली व तशी माहिती सौ.देशमुख यांना देण्यात आली, असे प्रतिपादन श्री.देशमुख यांच्या वतीने उपस्थित असलेले प्रतिनिधी श्री.संतोष जिरगे, सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी केले.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता सौ.देशमुख यांची मुख्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशी मागणी येत नाही, तरीही वारंवार त्याच स्वरुपाचे अर्ज करीत राहण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१७.९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री.मारुती भाऊ महाजन
रा. कारोची (धनगर माळ, अंगणवाडी नजीक),
पो.गंगानगर, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पोलीस अधीक्षक,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी, — उत्तरवादी
जयसिंगपूर विभाग, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१५ / कोल्हापूर /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारुती भाऊ महाजन
रा. कारोची (धनगर माळ, अंगणवाडी नजीक),
पो.गंगानगर, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा पोलीस अधीक्षक,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर श्री.पी.बी.भोसले

**जन माहिती अधिकारी तथा** उप विभागीय पोलीस अधिकारी,
जयसिंगपूर विभाग, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.राजेश सीताराम परदेशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.११.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.३.२००९ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

श्री. गौस महंमद फजलूर रहिम शेख अध्यक्ष, महात्मा गांधी भ्रष्टाचार विरोधी कृती संघटना, लोकमान्य नगर, कोरोची यांनी दिलेल्या तक्रार अर्जाची नक्कल यासह एकूण तीन मुद्दयाची माहिती.

## विवेचन

आपल्याविरुध्द कोरोची, धनगर माळ येथील लोकांनी दि.२९.१२.२००६ रोजी अर्ज दिला होता, त्यावर कोणाच्याही सह्या नव्हत्या. दि.३०.१२.२००६ रोजी त्याबाबत जबाब झाले होते. या अर्जाची प्रत वारंवार मागणी करुनही आपल्याला दिली जात नाही, म्हणून श्री.मारुती भाऊ महाजन यांनी विविध पातळ्यांवर अनेक अर्ज केले असून राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२९.१२.२००६ चा म्हणून आपल्याला ज्या अर्जाची प्रत दिली आहे, त्यावर दाखल तारीख २९.१.२००७ आहे. म्हणजे हा अर्ज २९.१२.२००६ चा नाही हे सिध्द होते. मूळ अर्ज आठ-दहा ओळींचा होता. त्यात आपल्यावर काही आरोप होते, तो बदलून दुसरा अर्ज घेतला आहे व त्याची नक्कल आपल्याला दिली आहे, असे निवेदन श्री.महाजन यांनी लेखी व तोंडी केले. श्री.महाजन यांनी मागितलेली सर्व माहिती दिलेली आहे. पोलीस दप्तरी असलेल्या दि.२९.१२.२००६ च्या अर्जाची प्रत त्यांना दिलेली आहे. या व्यतिरिक्तचा अर्ज दाखलच झालेला नाही, त्याची प्रत ते मागत आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर विभाग, जयसिंगपूर श्री.पी.बी.भोसले यांनी दि.२९.५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. श्री.महाजन यांनी माहितीच्या अधिकारात व अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांना समक्ष भेटून केलेल्या मागणीनुसार त्या त्या वेळी त्यांना

माहिती देण्यात आली आहे. अन्य कोणताही अर्ज पोलीस ठाण्यात उपलब्ध नाही, असे वेळोवेळी कळविण्यात आले आहे. तरीही तीच माहिती ते मागत आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर श्रीमती शारदा राऊत यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. त्याचाच पुनरुच्चार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर विभाग, जयसिंगपूर श्री.पी.बी.भोसले यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. श्री.पी.बी.भोसले व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.राजेश सीताराम परदेशी यांनी संबंधित कागदपत्रे आयोगापुढे सादर केली. श्री.महाजन म्हणतात त्या आरोपांचा त्यांना दि.२९.१२.२००६ च्या अर्जाची जी प्रत दिली आहे, त्यात समावेश आहे. अर्ज दि.२९.१२.२००६ चा असून त्याची नोंद दि.२९.१.२००७ ला झाल्याची स्वाक्षरी अर्जावर आहे. याचा अर्थ तो नंतरचा अर्ज ठरत नाही. यासह सर्व मूळ कागदपत्रे त्यांना दाखविण्यात आली आहेत, असे श्री.भोसले यांनी नमूद केले. मात्र मूळचा अर्ज गहाळ करुन हा नवा अर्ज तयार करुन घेतला आहे, अशी श्री.महाजन यांची तक्रार आहे, त्याबाबतचे त्यांचे मौखिक निवेदन या व्यतिरिक्तचा कोणताही पुरावा त्यांनी सादर केलेला नाही. कागदपत्रे बदलली वा नव्याने तयार केली अशा स्वरुपाची त्यांची तक्रार असल्यास योग्य त्या न्यायासनाकडे त्यांना दाद मागावी लागेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. मारुती भाऊ महाजन
कारोची (धनगर माळ, अंगणवाडी नजीक),
पो.गंगानगर, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्र. प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा श्रेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
उद्योग भवन, तळ मजला, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१७+६१८ / कोल्हापूर / २००९ |
| २ | सुनावणीची तारीख | १७.९.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. मारुती भाऊ महाजन<br>कारोची (धनगर माळ, अंगणवाडी नजीक),<br>पो.गंगानगर, ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** प्र. प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर श्री.दि.को.खेडकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा श्रेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>उद्योग भवन, तळ मजला, कोल्हापूर श्री.न.सं.अवताडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.११.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१३.१.२००९ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

दिनांक १०.१०.२००६ रोजी कोरोची धनगरमाळ येथील गणेश मंदिर व अंगणवाडी आवारात, तसेच श्री. कांबळे गांजवे यांचे उद्योगासमोर ध्वनीची तिव्रता मोजली त्याबाबत मोजणीचे शुल्क रुपये २२८०/- मागणी केली होती. सदर चुकीची मोजणी फी कळविण्याबाबत चौकशी करण्याचे आदेश आयोगाकडून अपील क्र.२८० / कोल्हापूर मध्ये दिले होते. त्यानुसार माहिती देणेचे टाळणेसाठी मोजणी फीची मागणी केली होती काय, याची माहिती.

## विवेचन

अपील क्र.२८० मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार ध्वनीची तीव्रता मोजण्यासाठी आकारलेल्या शुल्काबाबत केलेल्या चौकशीची माहिती अपीलकर्ता श्री.मारुती भाऊ महाजन यांनी जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती. माहिती देण्याचे टाळण्यासाठी शुल्क मागणी केली होती काय, अशी विचारणा श्री.महाजन यांनी केली आहे. त्यावर समाधानकारक उत्तर न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.महाजन यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.महाजन राहत असलेल्या परिसरातील दोन कारखानदारांच्या यंत्रमागांमुळे आपल्याला त्रास व ध्वनी प्रदूषण होत असल्याची तक्रार सातत्याने विविध पातळ्यांवर करीत आले आहेत. माहितीच्या अधिकारातही त्या अनुषंगाने त्यांनी अनेक अर्ज व अपिले केली आहेत, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

श्री.महाजन यांनी धनगर माळ, कोरोची, तालुका हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील गणेशमंदिर व आंगणवाडी परिसरातील ध्वनीप्रदूषण तीव्रता मोजणी करुन मागितली होती. प्रदूषणविषयक नियमानुसार मोजणीशुल्क त्यांना कळविण्यात आले होते. शुल्क आकारणी चुकीची केलेली नाही व माहिती टाळण्यासाठी केलेली नाही. मात्र आपण सार्वजनिक जागेतील

ध्वनीप्रदूषणाच्या मोजणीची मागणी करीत असल्यामुळे शुल्क आकारता कामा नये, असे श्री.महाजन यांचे म्हणणे आहे. या शुल्क आकारणीची श्री.गांजवे व श्री.कांबळे या संबंधित उद्योजकांकडून वसुली करावी, अशी त्यांची मागणी आहे. मोजणीशुल्क कळविल्याबाबत उपप्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर यांचा खुलासा मागविला असून त्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे श्री.महाजन यांना कळविले होते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.दि.को.खेडकर व जन महिती अधिकारी श्री.न.सं.अवताडे यांनी केले. परंतु यानुसार कार्यवाही झाली नाही व आपल्याला दोन महिने बावीस दिवस विलंबाने माहिती मिळाली. मोजणीशुल्क रु.२२८० ची वसुली संबंधित कारखान्यांकडून करावी, असे निवेदन श्री.महाजन यांनी केले. अशा प्रकारे वसुली करता येत नाही, त्यामुळे वसुली केलेली नाही व तशा कारवाईची श्री.महाजन यांची मागणी आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी श्री.दि.को.खेडकर यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती येत नाही. कळविलेले मोजणीशुल्क चुकीचे नाही, नियमानुसार आहे, हे अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह स्पष्ट केले आहे. तसेच त्याची वसुली श्री.महाजन यांच्याकडून केलेली नाही, हेही योग्य आहे.

**<u>अपील क्रमांक / ६१८</u>**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ५ च्या कलम ४ नुसार आवश्यक असलेल्या माहितीतील ध्वनी प्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण ) नियम २००० ची माहिती दिलेली नाही, अशी श्री.महाजन यांची तक्रार आहे. ती १५ दिवसात देण्याचे श्री.अवताडे व श्री.खेडकर यांनी दि.२९.५.२००९ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त मान्य केले होते. त्यानुसार प्रदूषण मंडळाच्या नवीन नियमांची प्रत त्यांना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन श्री.अवताडे व श्री.खेडकर यांनी केले. मंडळाकडे येणाऱ्या तक्रार अर्जांवर निश्चित किती दिवसात कार्यवाही केली जाते, याची माहिती दिलेली नाही. तसेच आपण केलेल्या तक्रार अर्जांवर तातडीने कार्यवाही

होत नाही, अशी तक्रार श्री.महाजन यांनी केली. श्री.कांबळे व श्री.गांजवे यांच्या कारखान्यामुळे ध्वनी प्रदूषण होते, आपल्याला खूप त्रास होतो, इत्यादी तक्रारींसाठी गेल्या तीन वर्षांपासून आपण अनेक अर्ज करीत असून त्यावर कोणत्याही प्रकारे कारवाई झालेली नाही, अशी तक्रार श्री.महाजन यांनी केली. माहितीच्या अधिकारात, लोकशाही दिनात व अन्य स्वरुपाचे असे वीस-पंचवीस वेगवेगळे अर्ज श्री.महाजन यांनी केले आहेत, त्या सर्वांची दखल घेण्यात आली आहे. तक्रार अर्जांची दखल घेण्याबाबतची नियमावली श्री.महाजन यांना देण्यात आली असून, त्या व्यतिरिक्त विशिष्ट दिवसांची मर्यादा असलेले नियम अथवा मानके नाहीत. छोटे छोटे हातमाग व यंत्रमागधारक त्या परिसरात आहेत, त्यांच्यावर कारवाई करणे शक्य नाही. प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवरील पुढील कारवाईबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून परवानगी घेणे आदी प्रक्रिया केली जात आहे, असे अपिलीय प्राधिकारी श्री.दि.को.खेडकर यांनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता या अपिलातही अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. त्यांना होणाऱ्या त्रासाचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी त्यासाठी त्यांनी उचित न्यायासनाकडे दाद मागावी लागेल, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही बाब येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अमान्य.

(२) संबंधित कारखान्यांकडून प्रदूषण मोजणीशुल्क वसूल केलेले नसल्याच्या तपशिलासह लेखी पत्र अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी द्यावे.

(३) श्री.मारुती भाऊ महाजन यांच्या तक्रारअर्जांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी श्री.दि.को.खेडकर यांनी आयोगाला सादर करावा व त्याची प्रत श्री.महाजन यांना पुरवावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.०९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरूण वामनराव घोडके
मु.रूई, पो.मालेगाव, ता. बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १८.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर श्री. एस.के.चिल्लाळ

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, उपविभाग, बार्शी, जि. सोलापूर श्रीमती सुनिता पाटील

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे गौडगांव ते चिलवडी व मौजे मिर्झनपूर ते आंबेगाव या रस्त्याच्या रोजगार हमी योजनेतील कामावरील कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकाच्या छायांकित प्रती

## विवेचन

मौजे गौडगांव ते चिलवडी व मौजे मिर्झनपूर ते आंबेगाव या रस्त्याच्या रोजगार हमी योजनेतील कामावरील कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकाच्या छायांकित प्रतींची मागणी अपीलकर्ता श्री. अरूण वामनराव घोडके यांनी केली होती. अपूर्ण माहिती मिळाल्याच्या कारणावरून श्री. घोडके यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर यांच्याकडे अपील केले. 'जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम ) जिल्हा परिषद, उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर यांनी उपलब्ध माहिती वेळेत दिली, ऊर्वरित माहितीबाबत योग्य ती कार्यवाही करून माहिती उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे अपूर्ण माहिती देण्याबाबत ते दोषी दिसत नाहीत. संबंधित शाखा अभियंता श्री. व्ही.एन. मोहिते हेच त्याला सर्वस्वी जबाबदार असून त्यांच्या विरूध्द कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून शिस्तभंगाची कारवाई चालू आहे,' असे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर यांनी अपील निकाली काढले. काही हजेरी पत्रके श्री. मोहिते यांनी कार्यभार सुपूर्त करतानाच्या यादीत न दिल्यामुळे त्यांच्या प्रती श्री. घोडके यांना देता आल्या नाहीत. श्री. मोहिते यांची बदली झाली असून त्यातील एक हजेरी पत्रक, श्री. मोहिते वैराग येथे जेथे दप्तर ठेवतात, त्या ठिकाणच्या कपाटामध्ये शोधून काढून त्याची प्रत श्री. घोडके यांना दिली आहे असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम ) जिल्हा परिषद, उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर यांनी सांगितल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी, यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे.

आपण शुल्क भरलेले असूनही आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही, असे श्री. घोडके यांनी लेखी निवेदनात नमूद केले.

आयोगाने दि. १८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर होते. शाखा अभियंता श्री. व्ही. एन. मोहिते यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई सुरु असून तत्कालीन शाखा अभियंता व्ही.एन. मोहिते यांना संबंधित कामाच्या प्रकरणात निलंबित करण्यात आलेले आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (बांधकाम ) जिल्हा परिषद, उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर श्रीमती सुनिता पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, बार्शी, जि. सोलापूर श्री. एस. के. चिल्लाळ यांनी नमूद केले. श्री. मोहिते यांना

माहिती देण्याबाबत लेखी व तोंडी सूचना देऊनही त्यांनी पूर्तता केली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. रोजगार हमी योजनेच्या कामावरील कर्मचाऱ्यांची हजेरी पत्रके हा सार्वजनिक स्वरूपाचा दस्तऐवज आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार कोणत्याही नागरिकाला तो कधीही उपलब्ध झाला पाहिजे. एखाद्या अधिकाऱ्यामुळे अशा प्रकारची माहिती जनतेपासून लपविली जात असेल, तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये अंतर्गत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाशी ते विसंगत आहे. परिणामी संबंधित कामाच्या प्रशासकीय कार्यवाहीत सार्वजनिक पैशाचा विनियोग कशा प्रकारे झाला याची माहिती नागरिकांपासून दडविली जात आहे असे करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करणे हा स्वतंत्र भाग आहे. मात्र सार्वजनिक स्वरूपाची माहिती दडविल्याबद्दल व अपीलकर्त्यास, आणि पर्यायाने नागरिकांना नाकारल्याबद्दल संबंधित शाखा अभियंता श्री. व्ही.एन. मोहिते हे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती देण्याचे नाकारल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, (बांधकाम ) जिल्हा परिषद, उपविभाग, बार्शी, जि.सोलापूर श्री. व्ही. एन. मोहिते (सध्या शाखा अभियंता, बांधकाम जिल्हा परिषद उपविभाग, सांगोला, जि.सोलापूर ) यांना रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती ऑक्टोबर व नोव्हेंबर २००९ या महिन्यात मिळणाऱ्या सप्टेंबर २००९ व ऑक्टोबर २००९ च्या त्यांच्या पगारातून वसूल करून ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १(१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सांगोला यांनी करून याची नोंद संबंधिताच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्याच्या छायांकित प्रती दंड भरल्याच्या पावतीच्या प्रतीसह दि. १०.११.२००९ पर्यंत आयोगास सादर करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८.९.२००९**